शोधी भूजनितें, प्रभुप्रिय करी, साधी जय, द्वेषिपूं
जाळी; रावणसैन्य पुत्र हि मथी, चितेंत घाली रिपू. ९
श्रीचें हृष्ट करावया मन निघे, घे कीशसेनाशतें,
भारानें जगती धरी भय तदा, राजा हि; मस्तें नतें
झालीं. जों जळधीस ये, प्रयतें तों बद्धांजळी तो यदा,
जैसा मोर तसा बिभीषण नमी, सारा मनोज्ञा पदा. १०
लंका श्री खचरा नमस्कृतिपरा दे देव, दावी दया;
बांधी सेतु जळांत आयतवरा, गावें महेंद्रें जया.
शक्रार्थे रजनीचरक्षय करी, जन्यांत अन्याय शें
ज्यांचे, त्यां गति दे प्रभु, श्रुतिपरा मर्त्या हि धन्या यशें. ११
श्रीकंठा चतुरानना अमरभूपा जो न मानी, तपा
नाशी, जन्म खळा वियेच्चरवरा मांसाशना मद्यपा
मारी राम मुकुंद; तैं 'जय! जय!' ध्वानें स्तवें दाटलें
ब्रह्मांडोदर; सर्वसज्जननरामर्त्यां बरें वाटलें. १२
श्रीतें घेउनि राक्षसारि सुमनोयानीं बसे, ये पुरा,
सद्भक्तानुजहप्रिय प्रभु करी राज्यें महीच्या सुरा.
सर्वां ही निववी जगासि सुयशें, अर्पी निजश्रेय तें,
राजीवाक्ष कवींद्रकोटिमहितें तारी चरित्रें ततें. १३
'सत्स्वरामायण' प्रेमें मयूरें रामनंदनें
श्रीरामचरणांभोजीं अर्पिलें कृतवंदनें. १४

इति श्रीसत्स्वरामायणं समाप्तं।

---

१. शत्रुपुरी (लंका). २. मस्तकें. ३. शुद्ध. ४. लांबरुंद; विस्तीर्ण. ५. राक्षसेंद्रा.



# मंत्रिरामायण

## बालकांड

(अनुष्टुप्‌वृत्त)

श्रीश ब्रह्मादिदेवांहीं प्रार्थिला, दिग्रथात्मज
होय, चार धरी मूर्ती, जो रक्षी संकटीं गज. १
राम ज्येष्ठ महातेज्या कौसल्योदरसंभव,
कैकेयीपुत्र भरत स्मर्त्यांचा नाशिता भव. २
महिला तिसरी, तीचे दोघे सद्‌गुण नंदन,
नामें लक्ष्मण शत्रुघ्न शीलनिर्जितचंदन. ३
जगतीपति दे दोघे राम लक्ष्मण गाधिजा,
देती सुबाहु मारीच क्रतु ध्वंसुनि आधि जो. ४
यज्ञावनें हृष्ट केला गुरु रक्षोबळक्षयें,
गौतमस्त्रीसमुद्धारें पापांचीं नाशिलीं भयें. ५
राजकोदंड भंगूनि वरिली जानकी सती,
न केवळ तिची च क्ष्मादेवीची हर्षली मती. ६
महर्षि देववी कन्या तिघां रामानुजांस त्या
तिघी दिल्या मैथिलानें ऊर्मिळादि महासत्या. ७
जनका दिग्रथा विश्वामित्रें संबंध जोडुनीं,
सिद्धाश्रमासि गमन केलें, तें पुर सोडुनीं. ८
यमसा गुरुचापाच्या भंगें भार्गव कोपला,
रामापुढें, रविपुढें दीपसा, परि लोपला. ९
जय पावोनि, साकेता बहु हर्षवि, दिग्रथ
योग्य पुत्रस्नुषालाभें हर्षे, होय गतव्यथ. १०
यश गाती पोर तैसें स्वर्गीं राहून देव ही,

---

१. ज्या.

मनु ज त्व स्त्रैणभाव प्रभु दाखवि 'हा!' वदे,
तो विलाप वना तैसा जैसा संताप दाव दे. ३६
सद य प्रभु दे गृध्रा पुत्रसा परमा गती,
मागती जी यती, शोधी श्रीपदीं परमाग ती. ३७
उद्ध रा या कबंधातें सांपडे भगवान् बळें,
शबरीतें अमृत दे, बहु मानी तिचीं फळें. ३८
दुग्धा म लयशा स्वामी मुग्धाच्या रीतितें धरी
पंपातीरीं; भक्तशोक संपाया 'हा!' म्हणे हरी. ३९

अरण्यकांड:

## किष्किंधाकांड

मारुति श्री वरा भेटे, सुग्रीवा मग भेटवी,
तो सखा होय, हा ही त्या दहना वायु पेटवी. ४०
रघुवी रा अलंकार सीतेचे दाखवी हरी,
'नूपुरें तीं च' सौमित्री म्हणे, राम उरीं धरी. ४१
त्या अर्थ म सुत प्रार्थी, "सख्या! होवूं नको श्रमी.
हारिलि स्त्री अग्रजानें 'हा!' म्हणें हारि ही न मीं. ४२
तुझी तु ज प्रिया यत्नें भेटवीन चि, अन्यथा
करूनि त्या रावणाच्या, मदुक्ता जाण सत्य या." ४३
श्रितश्रे य स्कर म्हणे, 'तूं असावासि साधि न,
सख्या! मीं तों तुझें आधीं सर्वथा कार्य साधिन.' ४४
भार्याह रा हंतुकामा प्रमत्ता वाळिला वधी,
त्याची श्री स्त्री दे सुकंठा, म्हणे, 'धर्मीं च लाव धी.' ४५
धाडी स म र्थ प्लवग श्रीशोधा सुगळ स्वयें.
लंघितां मास, मारील, या भित्तीं कांपले भयें. ४६
ते महा ज व शोधूनि आले आज्ञाश्रयाप्रती,
अवध्यतिक्रमें झाली अन्यांची व्याकुळा मती. ४७

१. हस्तदोष–स्त्रैयभाव. २. हस्तदोष–पंपातिरीं. ३. हस्तदोष–श्री.



तयां प्रा य गतां सांगे जटायुज्येष्ठ शोध हो!
'सिंधु शंभर गावें, ती सीता लंकेंत योधहो!' ४८
तो अंड ज स्वपक्षांच्या दाहाची ऐकवी कथा,
तत्काळ पक्षोत्पत्तीनें दे प्रत्यय, हरी व्यथा. ४९
वातका य ज ऋक्षेंद्रें पुराणें ब्रह्मसंभवें
केला स्वशक्तितत्वज्ञ वरादिकथनें स्तवें. ५०
महाप रा क्रमज्ञान जांबवान् दे जसा गुरु,
म्हणे, 'बोध महामोहा परगर्वा तसा चुरु.' ५१
निज सा म र्थ्य कळतां उत्साहें कपि दाटला,
शतयोजन पाथोधि स्पष्ट गोष्पद वाटला. ५२

किष्किंधाकांड:

## सुंदरकांड

चिंतूनि तो श्री रामातें महेंद्रा ढांसळी, उडे;
फुटले तों राक्षसींचे, सीतेचे दाटले चुडे. ५३
ताडी महो रा मैनाका, ठकवी सुरसेस ही,
सिंहिकेतें वधी, लंघी लीलेनें सागरा मही. ५४
लंकादेवी म द हरी, योगें होय लहानसा,
पावे श्रीदर्शन, जसा क्षुधाकुळ महानसा. ५५
अशोकीं रा ज खळ ये, जें देवीसीं वदे कटु,
साहे, महावीर होता जन्हि तन्मथना पटु. ५६
जे धर्मन्या य युक्त श्रीवाक्य तेणें निवे कपी,
तापे घृतें ज्वरीसा जो खळ नष्ट विवेक पी. ५७
दुष्ट सांगे रा क्षसींला, 'इला शिक्षा करा बरी,
मासद्वयांत न वळे प्रातराशार्थ हो तरी.' ५८
उद्बंधनें म रूं पाहे, जातां पापी, महासती.
स्तवी मारुति, दे मुद्रा, वंदी, पावे महास ती. ५९

१. प्रायोपवेशन करून बसलेल्यांस. २. खळराज रावण.

चूडामणी ज नकजा दे संदेश कथी, मग
अशोकोपवनांतील मोडी सर्व महानग. ६०
सैन्याचा क्ष य अक्षाख्यकुमाराचा हि हा करी;
ब्रह्मास्त्रा सांपडे, या इंद्रजित् क्षोभला धरी. ६१
कावी धनं ज य पुरा, पुच्छ पेटवितां खळें.
'जळें' म्हणे मनीं, 'द्वेष्ट्या!' विलंबी सागरा पळें. ६२
अंगदादि य शा गाती त्या मानी हित राम ही,
भेटे, घे अधमर्णत्व[1], देता ही इतरा मही. ६३
सांगे समी रा त्मज तो मार्गदुर्ग दुराग्रह
श्रीचा निरोप, स्वकृत न रक्षिति पुरा ग्रह. ६४
बिभीषण म हासाधू तयाची सरमा वधू,
त्रिजटा राक्षसी, साधू भव, काळ न या वधू. ६५

सुंदरकांड:

## युद्धकांड -

सुग्रीवयुक्त श्री राम बहुकीशबळासह
उतरे सागरतटीं, होय त्यासि भयावह. ६६
सांगतां हित रा गेजे, 'धिक्!' सभेमाजि ऐकवी,
बिभीषण निघे, भेटे, वंदी रामासि तैं कवी. ६७
लंकाराज्य न म स्कारें दे, सेतु करवी हरी,
प्रभुचापशिरें दावी श्रीस 'हा!' म्हणवी अरी. ६८
केला रक्षोरा ज भंग देखतां चि कपीश्वरें,
न मानिलें रावणें जें अंगदें कथिलें बरें. ६९
बहु रक्षक्ष य घडे, न चाले इंद्रजित्[2]छळ;
कुंभकर्ण मरे, साम तरी तो न करी खळ. ७०
सनाथ वान रा नीक मेघनाद रणीं खिळी,
स्वौषध्युपायें हनुमान् उठवी, मोह ज्या गिळी. ७१

१. ऋणीपणा. २. पृष्ठ २३ टीप ५ पहा.



मोहार्थ माया म यभूकन्याशिर कुधी हरी,
बिभीषण भ्रांति वारी, लक्ष्मण व्यसु त्या करी. ७२
मंत्री वारी भू ज निर्ते वधितां रावणा खळा,
वधार्थ प्रेरिलें तेणें जें त्या प्रभु वधी बळा. ७३
सौमित्रिहृद य क्रोधें भेदी रावण शक्तिनें;
पुन्हां सावध केला तो त्या चि निःसीमभक्तिनें. ७४
सप्ताहोरात्र ज न्यांत बसोनि हरिच्या रथीं
प्रभु मारी दशग्रीवा जेव्हां रवि म्हणे 'मथीं'. ७५
देववी त्या तो य आर्धी, प्रभु स्थापी नता पदीं.
शोभली अग्निच्या कुंडीं श्री जैसी पद्मिनी ह्रदीं. ७६
रक्षःप्लवग रा ज्यातें पुष्पकीं घे, पुरास ये;
स्वःपू म्हणे अयोध्येला, 'त्वत्प्रताप पुरा सये!' ७७
वैकुंठ झाला म हिप, यश वी गौर, विप्र ज्या
अर्था इच्छिति त्या सर्वां पुरवी, गौरवि प्रजा. ७८

युद्धकांड:

## उत्तरकांड

प्रभूतर्षिस्तुत श्री श स्वयशें नाशिता व्यथा,
दशास्य वाळी हनुमान् जे यांच्या आयके कथा. ७९
श्रीरामें पूजिले रा जे जनकप्रमुख स्वयें,
केला हनूमान् विश्रांत धन्य धन्य महादयें. ८०
ज्ञाता स्नेही पर म ही गर्भिणी स्वप्रिया सती,
अपवादें त्यजी, दोष न लावी स्वप्रियास [1]ती. ८१
सीतेसि वाल्मीकि ज पे स्वाश्रमांत पिता तसा,
पुत्र तीचे कुश लव प्राशिती सद्यशोरसा. ८२
दोघे दोघे तन य त्यां तिघांचे गुणसागर,
चौघांतें तेंवि आठांतें वर्णिती वन्य नागर. ८३

१. येथें लेखकानें अखेरची पंक्ति अर्धवट च सोडून विश्रांति घेतलेली दिसते.

शत्रुघ्न मारी क्रूरा त्या लवणा मधुरा करी,
जे तीन कोटि गंधर्व वधिले भरतें अरी. ८४
न्यायेंकरूनि र म वी श्वान गृध्र उलूक ही;
मृत विप्रापत्य रक्षी, सद्यशें निववी मही. ८५
अश्वमेधीं आत्म ज ते वाल्मीकिच्छात्र हर्षले,
आदिकाव्यामृत प्राज्य सम सर्वत्र वर्षले. ८६
द्यावया प्रत्य य जना पुन्हां ती जानकी, 'धरे!
असेन शुद्धा तरि घे' म्हणे तदुदरीं भरे. ८७
आठां राज्यांसि भ ज ते झाले आठ कुमार ते,
पुण्यकीर्ति सदा रामीं, शिवीं जेंवि उमा रते. ८८
सत्यप्रतिज्ञस्व य श प्रभुनें निज रक्षिलें;
भक्षिलें वन्य, वेंदोक्त गुरूक्त सम लक्षिलें. ८९
भक्तकल्पद्रुमा रा में रामें रंजविलें जग,
एकादशसहस्राब्द पुर उद्धारिलें मग. ९०
चारित्रीं विश्व र म लें, शमलें, सर्व पातक,
श्रीराम मेघ गमला भक्त ते मोर चातक. ९१
'मंत्रिरामायण' प्रेमें मयूरें रामनंदनें,
श्रीरामचरणांभोजीं अर्पिलें कृतवंदनें. ९२

इति श्रीरामनंदनमयूरविरचितं मंत्रिरामायणं समाप्तं ।

---

# नामांकरामायण

(गीतिवृत्त)

राजीवोद्भव विनवी विश्वाहितदशमुखासि माराया;
मधुकैटभारि दशरथसुत होय, त्रिभुवनासि ताराया. १
रामप्रभु कौसल्यासुत, कैकेयीकुमार तो भरत,
महितगुण सुमित्रात्मज लक्ष्मणशत्रुघ्न कीर्तिलोभरत. २



राज्यासि रामलक्ष्मण गाधिज मागे स्वयाग रक्षाया.
मनुजेंद्र, गुरुनिदेशें, दे प्रिय ही प्रणतभद्रदक्षा या. ३
राहुनि आज्ञेंत सदा सादर, मारूनियां पर, महर्षी,
मॆख संरक्षुनि, केला श्रीरामें, सानुजें, परम हर्षी. ४
रामा गौतममुनिची हर्षविली, प्रदरजें हरुनि शापा;
मग जनकपुरीं सीता, लीलेनें राघवें चुरुनि चापा. ५
'रा[1]केशमुखी सीता रामाला, तदनुजां तिघी अन्या
महितगुणा दे' ऐसें सांगुनि, मुनि जाय, मैथिला धन्या. ६
राजा जनक दशरथा आणुनि, सानुज तदीयतनयांतें,
मणिकनकभूषिता दे कन्या; 'बहु धन्य!' म्हणति जन यांतें. ७
रागेजे हरकार्मुकभंगें भार्गव, तया करी शांत.
[2]मन्यु त्यजुनि, म्हणे 'बा! तूं तों, जो चुकविता करीशांत!' ८
राहुविमुक्त शशीसा दशरथराजा विशंक धरि तेजा.
मन क[3]र्दमळांत बुडतां क्षण, म्हणती व्यसु चि बोध करते ज्या. ९
राब गमे इतराची, रामाची, पुरजनासि, कीर्ति सुधा;
मधुरत्वादि यश परा न भजे, जें काय कामधेनुदुधा. १०
राज्यासि पुसोनि, युधाजिन्मातुळ ने सहानुजा भरता;
मतिमाजि विचार असा [4]होय नृपाच्या जगद्धिता भ[5]रता. ११
रा[5]ज्यभरोद्वहनोचित, सद्गुणसंपन्न, राम, लोकांस
मत, युवराज करावा; करिल महें पूर्ण हा [6]सदोकांस. १२
राजप्रियेसि सांगे सुरदूषितबुद्धि मंथरा दासी,
'मन हृष्ट कां? सपत्नीसुतराज्यें दीनतेसि कीं जासी. १३
राबीव सपत्नीतें, स्वसुता मागोनि राज्य घे च वरें;
मन्वब्द राम वरु वन, उडवुत भरतीं सपत्न [7]हें चवरें.' १४
राज्ञी तसें चि करि ती; मागे वर; सत्यसादरा अडवी.

---

१. पूर्णचंद्रानना. २. क्रोध. ३. मोहांत. ४. शिरला; आला. ५. राज्यकारभार वाहण्याला योग्य. ६. सज्जनांच्या गृहाना. ७. हस्तदोष–हें.